# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमधून अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटविल्याबाबत

**(१) ३६६ (१७-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमधून ३८९१ अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स माहे डिसेंबर, २०२४ मध्ये हटविण्यात आले असून ७६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीत अधिकृत फलक लावण्यासाठी जाहिरात विभागाने जागा निश्चित केल्या असून त्याचे शुल्क भरून केवळ त्याच ठराविक भागात जाहिरात लावता येणार असून याबाबत संबंधितानी सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त, ठाणे यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीत अधिकृत किती फलक लावण्यात आले आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ०१ एप्रिल, २०२४ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत एकूण ९७४० अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, फ्लेक्स व जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात आली असून, १२९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अधिकृत जाहिरात फलक लावण्यासाठी एकूण २०४ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

(३) ठाणे महानगरपालिका हद्दीत अधिकृत फलक लावण्यासाठी, महानगरपालिकेने एकूण २०४ जागा निश्चित केल्यानंतर, दिनांक ०९ एप्रिल, २०२४ ते दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत निश्चित केलेल्या जागांपैकी १९ ठिकाणी फलक लावण्यास परवानगी देण्यात आली आहे.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रेरेषेखालील जनतेकरीता योजना राबविण्याबाबत

**(२) ८८३ (१६-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील जनतेचे प्रमाण २६% असून ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील जनतेचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनामार्फत कोणत्या योजना राबविल्या जात आहेत,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास व अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कोणत्या नवीन योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०२६) :** (१) निती आयोगाने गरीबीचे मोजमाप करण्यासाठी बहुआयामी गरीबी निर्देशांक (Multi Dimensional Poverty Index-MPI) विकसित केला आहे. निती आयोगाच्या २०२३ च्या अहवालानुसार राज्याचा MPI १४.८ टक्क्यावरुन (सन २०१५-१६) ७.८ टक्क्यापर्यंत (२०१९-२१) खाली आला आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट नुसार राज्याचा MPI सन २०२९ पर्यंत शून्य टक्के करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या २०११ च्या सामाजिक आर्थिक सर्वेक्षण Social Economic and Caste Census या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील गरीब जनतेचे जीवनमान उंचवण्यासाठी राज्यातील बेघर व कच्च्या घरात रहात असलेल्या लाभार्थ्यांकरीता प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविण्यात येते. तसेच ग्रामीण भागातील गरीब लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी बहुआयामी योजना शासनामार्फत राबविण्यात येतात. यामध्ये दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण उद्योजकता विकास कार्यक्रम महिला किसान सक्षमीकरण योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना इत्यादी विविध उपक्रम राबविले जातात.

(२) ग्रामविकास विभागामार्फत २५१५-१२३८ या लेखाशिर्षांतर्गत मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभुत सुविधा पुरविणे ही योजना सन २००९ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांनुसार ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची कामे मंजूर करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नगरपंचायत क्षेत्रातील अनुदानित, विनाअनुदानित शैक्षणिक संस्थाना मालमत्ता करात सूट मिळणेबाबत

**(३) ९०८ (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपंचायत क्षेत्रातील शैक्षणिक संस्थावर कर आकारणी केली जात असल्याने नगरपंचायत क्षेत्रातील अनुदानित, विनाअनुदानित शैक्षणिक संस्था चालविणे अवघड होत असल्याने मालमत्ता करात सूट मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार केल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका हद्दीतील अनुदानित, विनाअनुदानित शिक्षण संस्थाना मालमत्ता कर माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम १४३ अन्वये केवळ सार्वजनिक पूजाअर्चा किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रायोजनासाठीच भोगवट्यात असलेल्या व वापरण्यात येत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भागास सर्वसाधारण करातून सुट देण्याची तरतुद आहे.
महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ चे नियम १० (२) अन्वये जी कोणतीही इमारत किंवा जमीन निव्वळ शैक्षणिक किंवा धार्मिक कारणासाठी किंवा विनामुल्य वैद्यकीय कारणासाठी सेवा देण्यासाठी वापरण्यात येत आहे अशा इमारती किंवा जमिनींना उक्त अधिनियमाच्या नियम ४ व ५ नुसार असेल त्या कराच्या दराच्या निम्म्या दराने कर आकारण्याची तरतुद आहे.
त्याअनुषंगाने राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर अशा शैक्षणिक संस्थांना करातून सुट देण्याबाबत महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत त्यांच्या स्तरावरून कार्यवाही केली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ज्येष्ठ अभिनेते मनमोहन माहिमकर यांच्या आर्थिक अडचणींबाबत

**(४) १७३८ (२३-०४-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरगाव (मुंबई) येथील स्थायिक जेष्ठ अभिनेते मनमोहन माहिमकर यांना आर्थिक अडचण, पुनर्विकास प्रकरणी विकासकाकडून पर्यायी जागेचे भाडे मिळत नसणे, अ.भा.चित्रपट महामंडळाची पेन्शन बंद होणे इत्यादी बाबी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पुनर्विकास प्रकरणी विकासकाकडून पर्यायी जागेचे भाडे मिळणेसाठी व अ.भा.चित्रपट महामंडळाची बंद झालेली पेन्शन पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१), व (२) भुकर पाहणी क्र. ४८७, गिरगांव येथील इ.क्र. १३, सदाशिव लेन, क्षत्रिय भवन येथील खोली क्र. १८ संदर्भात श्री.मनमोहन माहिमकर हे प्रमाणित सहरहिवाशी असून, विकासकाने दिनांक २३/११/२०२४ पर्यंतचे पर्यायी भाडे अदा केले आहे.

मा.लघुवाद न्यायालयामध्ये श्री.जगदीश गजेंद्रनाथ माहिमकर यांनी RAD दावा क्र. ११३१/२०१४ अन्वये सहभाडेकरू म्हणून प्रमाणित करणे व भाडे मिळण्याबाबत दाद मागितली आहे. मा.लघुवाद न्यायालयाने दिनांक ३०/०३/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार पुनर्विकास काळातील तात्पुरत्या पर्यायी जागेचे रुपये ५५,०००/- प्रति महिना भाडे अंतिम निर्णयापर्यंत न्यायालयात जमा करण्याचे निर्देश आहेत.सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम नगरपरिषदेतील अभियंता संवर्गातील रिक्त असलेले पद भरण्याबाबत

**(५) २०२८ (१७-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम नगरपरिषदेमधील बांधकाम विभागातील अभियंता हे पद रिक्त असल्याने सदर कामाचा भार प्रभारी अधिकाऱ्यांवर येत असून त्याचा परिणाम शहराच्या विकास कामावर होत असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मधील तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रिक्त पदी त्वरीत नियुक्ती करावी अशी मागणी होत असून उक्त रिक्त पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) वाशिम नगरपरिषदेमध्ये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीत स्थापत्य अभियांत्रिकी श्रेणी अ, ब व क या संवर्गात एकूण ०६ पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा पदभार इतर अभियंत्याकडे दिलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नवीन होर्डिंग धोरणास अद्याप मंजुरी मिळाली नसल्याबाबत

**(६) २३१२ (१७-०७-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील होर्डिंग दुर्घटनेस एक वर्षे एवढा कालावधी होऊनही बृहन्मुंबई महानगरपालिकेने आखलेल्या नवीन होर्डिंग धोरणास शासनाने अद्याप मंजूरी दिली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होर्डिंग धोरणाला मंजुरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, सदर धोरणांस मंजुरी देण्याच्या दृष्टीने शासन करीत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास,राज्यातील बेकायदा होर्डिंग्ज व बॅनरची समस्या अनेक वर्षापासून कायम असून याविषयी मा.उच्च न्यायालयाने सन २०१७ मध्ये अत्यंत व्यापक व अंतिम निर्देश दिले असूनही या निर्देशांची अद्याप प्रभावीपणे अंमलबजावणी होऊ शकली नसून उक्त प्रकरणी कठोर शिक्षेची तरतूद करणेबाबत शासनाने

कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या मालकीच्या मुंबईतील जमिनीवर एकूण ३०६ होर्डिंग उभारण्यात आल्याची बाब माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सदर होर्डिंग उभारण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी घेण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, होर्डिंग पडून घाटकोपर येथे झालेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिके हद्दीत उभारण्यात येणाऱ्या जाहिरात फलका संबंधात तसेच इतर जाहिरातींच्या विनिमयनाबाबतच्या धोरणाचा मसुदा नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचे संदर्भ विचारात घेऊन नवीन जाहिरातीचे मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द करण्याचे काम महानगरपालिका स्तरावर प्रगती पथावर असल्याचे मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाने सन २०१७ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका, राज्यातील सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) व सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींसाठी जाहिरात धोरण व मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहे.

(४) नाही.

(५) राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींना दिनांक १४/०५/२०२४ व दिनांक ०६/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेने कळवा प्रभाग समिती हद्दीतील खाडीपात्रात अनाधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्याचे आवाहन केल्याबाबत

**(७) २५०३ (१७-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून कळवा खाडीपात्रातील २ हजार झोपड्यांना ठाणे महानगरपालिकेने माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान रेड अलर्ट दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा प्रभाग समिती हद्दीतील खाडीपात्रात बेकायदा राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षितस्थळी जाण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरात १४४४ इमारती धोकादायक असल्याची अधिकृत आकडेवारी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या इमारतींमध्ये जीव धोक्यात घालून लोक राहत असून पावसाळ्यापूर्वी या इमारती निर्मनुष्य करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) शहरातील धोकादायक इमारतींना तातडीने नोटीसा देऊन त्या पावसाळ्यापूर्वी निर्मनुष्य करण्याबाबत तसेच कळवा प्रभाग समिती हद्दीतील खाडीपात्रात बेकायदा राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षितस्थळी जाण्याचे आवाहन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) शासन परिपत्रक दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले असून सदर सर्वेक्षणानुसार १४४४ धोकादायक इमारतींचे वर्गवारी निश्चित करण्यात आली असून सदर १४४४ धोकादायक इमारतींपैकी, सी-१ प्रवर्गातील एकूण २८९ अतिधोकादायक मिळकतींपैकी ३७ मिळकती निष्कासित करण्यात आल्या असून, ११ मिळकतींबाबत मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत.

तसेच, सी-१ मध्ये घोषित केलेल्या इमारतींपैकी एकूण ६१ घरमालक/भोगवटादार यांनी इमारतीचे स्ट्रक्चरल रिपोर्ट सादर केले असून, सदर इमारतींना दुरूस्ती परवानगी देण्यात आली आहे. उर्वरित ११३ इमारतींचा पाणी व वीज पुरवठा खंडीत करून ४६ मिळकती संपूर्णतः रिक्त करण्यात आल्या आहेत. शिल्लक राहिलेल्या ६७ मिळकतींतील रहिवाशांचे स्थलांतरण करण्याची कार्यवाही पोलीस विभागाच्या समन्वयाने करण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेमार्फत कळवा खाडीकिनाऱ्या लगत वास्तव्य करत असलेल्या २१४ झोपडीधारकांना झोपड्यांचा / घरांचा वापर तात्काळ बंद करुन, इतरत्र सुरक्षित स्थळी निवासाचा पर्याय शोधण्याच्या दृष्टीने, स्थलांतर होणेबाबत महानगरपालिकेमार्फत झोपडीधारकांना नोटीसा बजाविलेल्या आहेत. तसेच दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर आवाहन प्रसिध्द करुन, नागरिकांना सूचित करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे, खाडीकिनाऱ्या लगत असलेल्या झोपड्यांचा पावसाळ्याच्या कालावधीमध्ये राहण्यासाठी वापर करुन नये या आशयाचे माहिती फलक सदर परिसरातील मुख्य चौकात लावण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका क्षेत्रातील शैक्षणिक संस्थाकडे थकीत असलेल्या मिळकतकराबाबत

**(८) २५१४ (१७-०७-२०२५) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंहगड इन्स्टिट्यूट (जि.पुणे) आणि अन्य ४१ संस्थांनी पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर थकवीला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंहगड इन्स्टिट्यूटच्या मिळकती जप्त करून लिलाव करून सुद्धा पुणे महानगर पालिकेचा थकीत कर भरला गेला नसून सिंहगड इन्स्टिट्यूटने त्यांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन देखील अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेचा कोट्यवधी रक्कमेचा मिळकत कर वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सिंहगड इन्स्टिट्यूटच्या मिळकतीच्या मालमत्ता पत्रकावर बोजा चढवण्याची कार्यवाही सुरु आहे. तदनंतर लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावर कंत्राटदारांनी सदोष कामे केली असल्याबाबत

**(९) २५९८ (१७-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समृद्धी महामार्गावर सिंदखेड राजा तालुक्यातील राहेरी बुद्रुक परिसरातील खडक पूर्णा नदीवरील पुलाच्या जॉईन मधील बेरिंग गॅप जवळ असलेला लोखंडी रॉड तुटल्याने नऊ वाहनांचे टायर एका मागोमाग फुटले असल्याची घटना माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच महामार्गावर आमने ते इगतपुरी दरम्यान काही ठिकाणी भेगा पडल्या असून सदर महामार्गावर सदोष कामे केल्याप्रकरणी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

समृध्दी महामार्गावर नागपूर कॉरिडॉर मध्ये साखळी क्रमांक कि.मी. ३२१+००० येथील मोठ्या पुलावरील एक्सपान्शन जॉईंटचा काही भाग अचानक निखळून बाहेर आल्याचे दिनांक ०१/०४/२०२५ रोजी रात्री ९.१५ वाजता निदर्शनास आल्याने तेथील वाहतूक तात्काळ दुसऱ्या लेनवर वळती करुन निखळलेल्या एक्सपान्शन जॉईंट चा निखळलेला भाग तातडीने हटवला असून तिथे लगेच तात्पुरती दुरुस्ती हाती घेण्यात आली होती आणि त्या ठिकाणी वाहतूक तात्पुरते लेन डायव्हर्जन देऊन चालू ठेवण्यात आली होती. त्यानंतर सदर काम दोष दायित्व कालावधी अंतर्गत असल्यामुळे तेथील एक्सपान्शन जॉईंट बदलण्याचे काम कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने माहे जून, २०२५ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२) समृध्दी महामार्गावर आमने ते इगतपूरी दरम्यान काही ठिकाणी काँक्रीट रोडवर किरकोळ भेगा पडल्या होत्या. कंत्राटदाराव्दारे त्याच्या स्वखर्चाने त्या त्वरीत इपॉक्सी ग्राऊटींगव्दारे बुजविण्यात आल्या आहेत. त्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेची वित्त समिती अद्याप रद्द न करण्यात आल्याबाबत

**(१०) २६७३ (१७-०७-२०२५) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी स्थापन केलेली वित्त समिती अद्याप रद्द झालेली नसून यास्तव म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सदर वित्त समिती रद्द करण्याविषयी पत्राद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वित्त समितीची मुदत तीन वर्षाची असतानाही तीन वर्षानंतर म्हणजेच दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी पुन्हा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी वित्त समिती गठित केली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिका व्यतिरिक्त अन्य कोणत्याही महानगरपालिकेमध्ये सध्याच्या काळात वित्त समिती नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वित्तीय समितीच्या मान्यतेने काम करण्याचा प्रशासनाचा विचार असल्याने शहरातील विकास कामे प्रलंबित रहाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी स्थापन केलेली वित्त समिती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
पुणे महानगरपालिकेच्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाय योजना करणेबाबत महानगरपालिका आयुक्त यांचा ठराव क्र.६/१४७, दिनांक ०२/०६/२०२० च्या मान्यतेनुसार प्रशासकीय स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे.

त्यानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे दिनांक ०१/०४/२०२१, दिनांक ०७/०४/२०२२, दिनांक १३/०४/२०२३ चे आज्ञापत्रानुसार अनुक्रमे सन २०२१-२२, २०२२-२३, सन २०२३-२०२४ व त्या पुढील कालावधीकरीता वित्तीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेतील खाते प्रमुखाकडून विविध कामांचे प्रस्ताव वित्तीय समितीकडे सादर केले जातात व सदर प्रस्तावावर समिती सदस्याबरोबर चर्चा करुन आवश्यकतेनुसार मान्यता दिली जाते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बदलापूर ते कांजूरमार्ग मेट्रोमार्गाला तत्वतः मान्यता दिली असल्याबाबत

**(११) ३३८९ (१८-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर ते कांजुरमार्ग मेट्रोमार्गाला तत्वतः मान्यता देण्यात आली असून कांजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो प्रकल्प- १४ हा ३७.८ किलोमीटर लांबीचा असून या मार्गावर पंधरा स्थानके असल्याची बाब माहे एप्रिल,

२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मेट्रो मार्ग सुरू करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१), (२) व (३) मुंबई मेट्रो मार्ग-१४ (कांजूरमार्ग ते बदलापूर) या मेट्रो प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४७ व्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मेट्रो मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक पर्यावरण, वन विभाग व इतर आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी सल्लागाराच्या नेमणूकीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी संदर्भात पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

## चिखलदरा (जि.अमरावती) येथील प्रलंबित स्कायवॉक प्रकल्पाचे काम पूर्ण करणेबाबत

**(१२) ३४१४ (१७-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाटातील चिखलदरा (जि.अमरावती) येथे ४०७ मीटर अशा सर्वाधिक लांबीचा स्कायवॉक प्रकल्पाचे ७२ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर नॅशनल वाइल्ड लाइफ बोर्डने सदर प्रकल्पाबाबत आक्षेप घेतल्यामुळे मागील आठ वर्षांपासून सदर स्कायवॉकचे काम प्रलंबित असल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,गत आठ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या उक्त स्कायवॉकचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, चिखलदरा परिसरातीलअसलेला नर्नाळा किल्ला किंवा इतर परिसराचा विकास झाल्यास झाल्यास पर्यटनाला चालना मिळू शकेल मेळघाट आदिवासी बहुल भागाचा विकास होऊ शकेल,त्यादृष्टीने सदर स्कायवॉकचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम ४०(१)ब नुसार सिडकोची चिखलदरा अधिसूचित क्षेत्राकरीता "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. चिखलदरा येथील गोराघाट पॉईंट व हरिकेन पॉईंट दरम्यानच्या दरीवर ४०७ मीटर लांबीचा स्कायवॉक सिडको महामंडळ बांधत आहे. या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ८/०२/२०१९ रोजी देण्यात आलेला आहे. त्यानुसार ७७% काम पूर्ण झाले असून केंद्रीय वन विभागाने हरकत घेतल्याने दिनांक २३/०६/२०२१ पासून सदर प्रकल्पाची विकास कामे थांबली होती. तद्नंतर दिनांक १९/०५/२०२३ रोजी नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ मंडळाकडून मान्यता मिळाली आहे. त्यानुसार पूर्ण १४ केबल ओढण्याचे काम झाले आहे.

उर्वरित काम प्रगतीपथावर असून साधारण मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) नर्नारा किल्ला हा सिडको अधिसूचित क्षेत्राच्या बाहेर आहे. स्कायवॉकचे काम पूर्ण करण्याकरीता सदर प्रकल्पाचे डिझाईन आयआयटी, दिल्ली यांच्याकडून तपासणी केलेले असून त्यांच्या प्राध्यापकांनी दिनांक २१/०४/२०२३ रोजी सदर प्रकल्पाची पाहणी करुन विंड टनेल टेस्ट करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार आयआयटी, दिल्ली व आयआयटी, कानपूर यांना संयुक्तरित्या विंड टनेल टेस्ट करुन त्यांचा अहवाल दिनांक १/०४/२०२५ रोजी सादर केला आहे. सदर अहवालाप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्ह्यांना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत समतोल निधी मिळणेबाबत

**(१३) ३४३३ (१७-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात जिल्हा वार्षिक योजनांसाठी रुपये २० हजार १६५ कोटींची तरतुद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा वार्षिक योजना निधीसाठीच्या मार्गदर्शक निर्देशांकामध्ये मानव विकास निर्देशांक,जिल्ह्याच्या गरजा,सामाजिक व भौगोलिक व्याप्ती यांचा विचार होतो, परिणामी ज्या जिल्ह्यांचे दरडोई सांकेतिक निव्वळ उत्पन्न जास्त त्यांच जिल्ह्यांना अतिरिक्त निधी मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) जिल्हा वार्षिक योजनेतून ज्या जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न कमी आहे (हिंगोली, भंडारा, गडचिरोली, नंदुरबार, गोंदिया, अकोला, बुलढाणा) त्या जिल्ह्यांना कमी निधी तर दरडोई निव्वळ उत्पन जास्त असलेल्या जिल्ह्यांना (पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर) अधिक निधी मिळत असल्याने मागस जिल्ह्यांवर अन्याय होत असून राज्य शासनाने वित्त आयोगाचे सुत्र (ज्यांचे दरडोई उत्पन्न कमी त्यांना अधिक वाटा) स्वीकारुन मागसलेल्या जिल्ह्यांना प्रगत करण्यात यावे अशी विनंती विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे माजी तज्ज्ञ सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाचा वित्त आयोग राज्यांना निधी वाटप करताना उत्पन्न अंतर या निर्देशकांप्रमाणे काम करत असून ज्या राज्याचे दरडोई उत्पन्न कमी आहे अशा राज्यांना निधीचा जास्तीचा वाटा मिळतो व संबंधित राज्याच्या समतोल विकासाला भरपूर वाव मिळतो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, केंद्र शासनाच्या वित्तआयोगाप्रमाणे जिल्हा वार्षिक योजनांचा निधी वाटप करताना उत्पन्न अंतर निर्देशकांप्रमाणे वाटप करुन जिल्ह्यांचा समतोल विकास साधण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१० अन्वये, “जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)” अंतर्गत जिल्ह्याची एकूण सर्वसाधारण लोकसंख्या (३०%), जिल्ह्याची ग्रामीण

सर्वसाधारण लोकसंख्या (२०%), जिल्ह्याचे क्षेत्रफळ (३०%), व मानव विकास निर्देशांक (२०%), या सुधारित सुत्रानुसार निधी वाटप करण्यात येते, तसेच राज्यात गतीने होत असलेले नागरीकरण लक्षात घेता, सर्व जिल्ह्यांना नागरीकरणाच्या प्रमाणात जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण) अंतर्गत "विशेष अतिरिक्त नियतव्यय" उपलब्ध करुन दिला जातो, त्यासोबतच आकांक्षित जिल्हे व तालुके यासाठी सुद्धा निधीची तरतूद केलेली आहे.

(३), (४) व (५) राज्य शासनाने वित्त आयोगाचे सुत्र (ज्यांचे दरडोई उत्पन्न कमी त्यांना अधिक वाटा) स्वीकारुन मागासलेल्या जिल्ह्यांना प्रगत करण्यात यावे, अशी विनंती विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे माजी सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या लेखी निवेदनाची प्रत वित्त व नियोजन विभागास प्राप्त झालेली नाही.

सद्य:स्थितीत १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाची स्थापना दिनांक ३१/१२/२०२४ च्या अधिसूचने अन्वये करण्यात आली आहे. त्यानुसार केंद्रीय वित्त आयोग केंद्र शासनास दिनांक ३१/१०/२०२५ पर्यंत अहवाल सादर करणार आहे. तद्नंतर केंद्र शासनाकडून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनेतून बोगस लाभार्थींनी अनुदानाचा अपहार केल्याबाबत

**(१४) ३६०४ (१७-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील कण्हेरखेड गावचे बनावट लाभार्थ्यांने गाय /गुरे अनुदान प्रकरणाद्वारे महामंडळाची दिशाभूल करुन योजनेचे अनुदानाचा अपहार केल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदर प्रकरणी संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे. मात्र लाभार्थी बनावट नसून लाभार्थ्याचा व्यवसाय सुरु असलेल्या कालावधीमध्येच व्याज परताव्याची रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी महामंडळाने चौकशी केली आहे. दरम्यानच्या कालावधीत लाभार्थ्यांने गाई / गुरांची विक्री केल्याचे चौकशीअंती निदर्शनास आल्यामुळे योजनेचा उद्देश सफल होत नसल्याने लाभार्थ्यांचा व्याज परतावा स्थगित केला आहे. लाभार्थ्यांस वितरित केलेल्या व्याज परताव्याची रक्कम एकरकमी महामंडळास परत करण्याबाबत लाभार्थ्यास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सिडकोमार्फत सर्वांसाठी घरे योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१५) ३६८२ (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "सर्वांसाठी घरे" या मा.पंतप्रधान यांनी हाती घेतलेल्या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत सिडकोने सुमारे एक लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ठ ठरविले असून त्यादृष्टीने सिडकोने नियोजन केले असल्याची बाब दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोमार्फत यापूर्वीच सुरु असलेल्या २५ हजार घरांचे बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे तसेंच सिडकोच्या अर्थसंकल्पानुसार सुमारे १ लाख घरे बांधकामाबाबत उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सिडकोने सप्टेंबर, २०१९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांकरीता एकूण ८६९६१ घरांसाठी गृहनिर्माण प्रकल्प हाती घेण्यात आले असून चार पॅकेजमध्ये विभागण्यात आले आहेत.

(२) सदर प्रकल्पांतर्गत सुमारे ६७२३५ घरांचे काम प्रगतीपथावर आहे. पॅकेज १ अंतर्गत एकूण १४८३९ घरांचे बांधकाम सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण होत आहे. पॅकेज २ अंतर्गत एकूण ८५०६ घरांचे बांधकाम जानेवारी, २०२६ ते मार्च, २०२७ पर्यंत पूर्ण होत आहे. पॅकेज ३ अंतर्गत एकूण ६७५८ घरांचे बांधकाम डिसेंबर, २०२५ ते डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होणारे आहे व पॅकेज ४ अंतर्गत एकूण १८४०२ घरांचे बांधकाम फेब्रुवारी, २०२७ पर्यंत घरांचे बांधकाम पूर्ण होणार आहे. तसेच याव्यतिरीक्त नावडे (तळोजा) नोड येथे एकूण १८७३० आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असून सदरील बांधकाम नोव्हेंबर, २०२७ पर्यंत बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे प्रादेशिक क्षेत्राकरीता शाश्वत दळणवळण विकास आखाड्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१६) ३८५१ (१७-०७-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड परिसरात (जि.पुणे) मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व महा मेट्रोमार्फत पुणे प्रादेशिक क्षेत्राकरीता शाश्वत दळणवळण विकास आराखडा करण्यासंदर्भात बैठक घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यांतर्गत पुणे शहर व पुणे प्रादेशिक विकास प्राधिकरण हद्दीतील मेट्रो, बी आर टी, एसटी, बस सेवा, रस्ते, वाहतूक व्यवस्थापन, पार्किंग सोल्युशन्स, पायाभूत सुविधा आणि इतर शाश्वत दळणवळण प्रकल्पाचे समन्वयक नियोजन उपाययोजना आणि विकास आराखड्यावर सूचना व मते मांडण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांचे पालन झाले नसल्याची बाब निदर्शनास आली असून सदर विकास आराखड्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) महामेट्रोद्वारे तयार करण्यात आलेल्या पुणे महानगर प्रदेशाच्या सर्वंकष वाहतूक आराखड्याच्या (CMP) मसुदा प्रस्तावांवर चर्चा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत महा-मेट्रोमार्फत सर्वंकष वाहतूक आराखड्याच्या (CMP) मसुद्याचे सादरीकरण करण्यात आले. सदर सादरीकरणामध्ये प्राप्त झालेल्या सूचना अभिप्राय विचारात घेऊन सर्वंकष आराखडा अंतिम करण्यात आला. तद्नंतर अंतिम सर्वंकक्ष वाहतूक आराखडा पुणे एकत्रिकृत महानगर परिवहन प्राधिकरणास महा मेट्रो मार्फत सादर करण्यात आला. सदर सर्वंकष वाहतूक आराखडा-२०२४ यास पुमटाच्या दिनांक १९/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच सदर आरखड्यास राज्य शासनाद्वारे दि ११/०९/२०२५ रोजी मान्यता देण्यात आली.

---

## राज्यातील मुंबई व पुणे येथील मेट्रो प्रकल्पाचे तिकिट प्रणालीशी संबंधित काम तुर्की कंपनीला दिले असल्याबाबत

**(१७) ४०१० (१७-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई व पुणे येथील मेट्रो प्रकल्पाचे तिकिट प्रणालीशी संबंधित काम एसिस गार्ड कंपनीशी संबंध असलेल्या एसीस इलेक्ट्रॉनिक या तुर्की कंपनीला दिले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑपरेशन सिंदूर नंतर पाकिस्तानने तुर्कस्थानने दिलेल्या ड्रोनने भारतावर हल्ले केल्यामुळे देशातील सर्व नागरीकांनी तुर्कस्थानचा निषेध केला असताना हे तुर्की कंपनीला दिलेल्या कामाबद्दल चौकशी करण्याचे मा.मुख्यमंत्री यांनी शासनास आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तुर्की कंपनीस दिलेले काम रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) पुणे येथे महामेट्रोमार्फत तिकीट प्रणालीसंबंधी प्रमुख भागीदार मे. एच. डी. एफ. सी. बँक लि., (४८ टक्के सहभाग), मे. बिलीसीम सिस्टीमलरी. ए.एस., तुर्की कंपनी (२६टक्के सहभाग) या संयुक्त भागीदारीतील कंपनीस दि १७/०३/२०२० रोजी करार करण्यात आला आहे. या कंपनीमध्ये प्रमुख भागीदार ही भारतीय संस्था आहे.
तसेच मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पासाठी स्वयंचालित तिकीट प्रणालीसाठी कालिंदी रेल निर्माण –टेक्समाको

रेल ॲण्ड इजिनिअरिंग लिमिटेड इंडिया या ९० टक्के सहभाग असलेली प्रमुख भागीदार व मे. एएसआयएस इलेक्ट्रॉनिक वे बिलीशिम सिस्टीमलरी ए.एस टर्की कंपनी यांच्या संयुक्त भागीदारी (JV) कंपनीसोबत दिनांक ०२/०४/२०१९ रोजी करार करण्यात आला आहे.
पुणे व मुंबई येथे तिकीट प्रणालीकरीता करारबध्द केलेल्या संयुक्त भागीदारी कंपन्यामधील प्रमुख भागीदारी कंपन्या या भारतीय आहेत. तसेच सदरहू करार हे कायदेशीर स्वरुपाचे आहेत.

---

## मृत पशुंची विल्हेवाट लावणे करीता नागरी स्वराज्य संस्थेत पुरेशी सुविधा उपलब्ध नसलेबाबत

**(१८) ४२४२ (१८-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पशु मृत झाल्यास त्या प्रेताची विल्हेवाट लावणे करीता शासनाची वन्य जीव संरक्षण कायदा १९७२(Wild Life Protection Act, १९७२) अन्वये नियम अस्तित्वात आहे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात अश्या मृत पशु यांची विल्हेवाट लावतांना प्रचलित पध्दतीचा अवलंब न करता सदरचे प्रेत हे घनकचरा डेपो येथे फेकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राणी मात्रांसाठी विशिष्ट धोरण असताना सदर बाबीकडे दुर्लक्ष होत असून अश्या प्रेतांची विल्हेवाट लावणे करीता (प्राणी भस्म यंत्र) Animal Incinerator हे प्रत्येक नागरी स्वराज्य संस्थेत उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने अथवा साथनिक स्वराज्य संस्थेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका, अहिल्यानगर महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका व वेंगुर्ला नगरपरिषदेत पशुदाहिनीव्दारे दहन पध्दतीने भटक्या / पाळीव प्राण्यांच्या मृतदेहांची विल्हेवाट लावली जाते.
राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी पाळीव प्राणी कुत्रे, मांजरे, पांढरे उंदिर इत्यादी प्राण्यांकरीता स्मशानभूमीची व्यवस्था करणे बाबतच्या सूचना दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीकेसी ते वरळी मेट्रोचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१९) ४४९३ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीकेसी ते वरळी मेट्रोची मुदत दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी संपली असून अद्यापही मेट्रो मार्गाचे काम पूर्णत्वास आले नसल्याचे माहे जून,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रो मार्गाचे काम पूर्ण न होण्याची नेमकी कारणे काय आहेत, तसेच राज्यातील इतर प्रलंबित मेट्रो प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे, तसेच विलंबामुळे होणाऱ्या खर्चवाढीची आर्थिक जबाबदारी कोण घेणार, याबाबत शासनाने खुलासा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१), (२) व (३) मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पाचा पहिला टप्पा (आरे – जेव्हीएलआर ते बी.के.सी हा दिनांक ०७/१०/२०२४ पासून, दुसरा (बी.के.सी. ते आचार्य यात्रे चौक,वरळी) दिनांक १०/०५/२०२५ रोजी पासून प्रवाशी वाहतूकीसाठी खुला करण्यात आलेला आहेत. तद्नंतर तिसरा व अंतिम टप्पा (आचार्य अत्रे चौक ते कफ परेड) हा दिनांक ०९/१०/२०२५ पासून वाहतूकीसाठी खुला करुन संपूर्ण मेट्रो मार्ग प्रवाशी वाहतूकीसाठी उपलब्ध आहे.
सद्य:स्थितीत मुंबई मेट्रो मार्ग १,२अ,३ व ७ हे प्रवाशी वाहतूकीसाठी उपलब्ध करण्यात आले असून इतरही प्रकल्पांची कामे अंमलबजावणीच्या प्रगत टप्प्यात सुरु आहेत. सदरहू प्रकल्पांची उर्वरीत कामे लवकरात लवकर पूर्ण करुन मार्गिका प्रवाशी वाहतूकीकरीता उपलब्ध करुन देण्याकरीता शासन प्रयत्नशील आहे.

---

## वसई-विरार महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचारी नियुक्ती व बदली नियमानुसार करण्याबाबत

**(२०) ४५४७ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या लेखा परीक्षकांनी अधिकारी-कर्मचारी नियुक्ती व बदलीचे लेखापरीक्षण करण्याची सूचना केली असतानाही सदरहू सुचनेची अंमलबजावणी वसई-विरार महानगरपालिकेने आजतागायत केली नसल्याची बाब माहे जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिणामी विविध प्रकरणांत दोषारोप असलेल्या १० पेक्षा अधिक प्रभारी सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना वसई-विरार महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाने पुन:स्थापित करून स्वत:च्याच निलंबन आदेशांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेच्या नियमबाह्य धोरणांमुळे दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजी सहाय्यक आयुक्तपदी बढती मिळालेल्या १६ महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर अन्याय झाला आहे, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले सदर चौकशीच्या अनुषंगाने वसई-विरार महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचारी नियुक्ती व बदलीचे तातडीने

लेखापरीक्षण करून दोषारोप असलेल्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या आस्थापनवेरील अधिकारी / कर्मचारी यांचे शिस्तभंग विषयक प्राधिकारी हे आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका असून, प्रभारी सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत असताना निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम, शासन अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक, निलंबन आढावा समितीच्या शिफारशीनुसार, तसेच विभागीय चौकशीच्या अधीन राहून महानगरपालिकेने पुन:स्थापित केले आहे.
(३) खरे नाही.
(४) व (५) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.